Exh. 11/B

किरकोळ दिवाणी अर्ज नं. २८८/२०२५

मे. जिल्हा न्यायाधिशसो, कोल्हापूर.

यांचे कोर्टात..

सौ.सुशिला महादेव ढोबळे } अर्जदार

वि।।

श्रीमती. पार्वती आण्णा ढेरे } वि.प.

Seen & filed
PDJ Kop
20-2-26

यातील वि.प. नं. १ व २ तर्फे म्हणणे पुढील प्रमाणे ,

१) अर्जदार यांचे अर्जातील सर्व मजकूर खोटा, चुकीचा व लबाडीचा असून प्रस्तुत वि.प. यांना तो कोणत्याही प्रकारे मान्य अगर कबूल नाही. त्यातील सर्व कथनांचा प्रस्तुत वि.प. स्पष्ट शब्दात इन्कार करतात केवळ वि.प. यांना आर्थीक व मानसिक त्रास देणे करीता अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाची रचना केलेली आहे. सदर अर्ज कायदयाने चालणेस पात्र नसलेने तो प्रथमदर्शनी फेटाळण्यात यावा.

Copy Received
20/2/2026.

२) प्रस्तुतचे कामी मा. खालील कोर्टानी रे.द.नं. ०४/२०२५ मध्ये वेळोवेळी पारीत केलेले आदेश हे न्यायप्रविष्ठ व वाजवी आणि कायदयाच्या तरतुदीनुसार असलेने सदर आदेशावरती संशय घेण्यासारखे कोणतेही कारण संयुक्तिक दिसून येत नाही अथवा

सदरचे आदेश कायदयाच्या तरतुदीच्या विरूध्द असले बाबतचे कोणतेही ठोस असा संशयास्पद पुरावा मे. कोर्टासमोर हजर केलेला नाही.

३) अर्जदार यांनी सी. पी. सी. कलम २४ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही. सदर काम अन्य न्यायाधिशांच्याकडे वर्ग करणेकरीता संयुक्तिक कारण असले पाहिजे. तश्या स्वरूपाचे कारण प्रस्तुत अर्जामध्ये नाही. कारण मुळ दरखास्त ही प्रस्तुत कामातील वि.प.नं. ४ या दरखास्तदार नं. १ व अर्जदार या दरखास्तदार नं. २ आहेत. सदर कामी अर्जदार यांनी दरखास्तदार नं. १ यांना वि.प.नं. ४ केलेले आहे आणि सदर कामी अर्ज कलम १५ मध्ये त्यांना वि.प. म्हणूण फॉर्मल पक्षकार केलेचे कथन केले आहे. परंतु दरखास्त कामी दिलेला पत्ता व प्रस्तुत कामी दिलेल्या पत्त्यावरती वि.प.नं. ४ राहात नसलेचे बेलीफ रिपोर्ट वरून दिसून येते. यावरून अर्जदार या वि.प.नं. ४ च्या बाबत आणि दरखास्तदार नं. १ यांच्या बाबत खरी वस्तुस्थिती लपवत आहेत. वि. प.नं. ४ यांनी अर्जदार यांचे समवेत दरखास्त दाखल करताना त्यावरती सहया केलेल्या आहेत. परंतु वि.प. नं. ४ या मे. कोर्टानी आदेश केले नंतर मे. कोर्टात हजर राहणेस तयार नाहीत. यावरून वि.प.नं. ४ व मुळ दरखास्तदार नं. १ यांचे बाबत संशय निर्माण होत आहे. खालील मे. कोर्टानी वि.प.नं. ४ यांना मे. कोर्टात हजर राहणे बाबत केलेले आदेश न्यायोचीत आहे. असे असताना अर्जदार यांनी जाणिवपूर्वक मे. कोर्टासमोर खरी वस्तुस्थिती येवू नये या करीता खालील मे. कोर्टावर अविश्वास दाखवून वर्ग करणेसाठी केलेला अर्ज चालणेस पात्र नाही.

४) कोणतेही काम वर्ग करणेसाठी संयुक्तिक कारण पाहिजे ते कारण सदर कामी नाही. सी.पी.सी. कलम ४७ प्रमाणे मे. कोर्टांना दरखास्तीमध्ये व दाव्यातील निर्माण होणारे न्यायोचीत प्रश्न निकाली काढणेचे संपूर्ण अधिकार आहेत. त्या अधिकाराच्या अधिन राहून मे. कोर्टांनी पारीत केलेले आदेश न्यायोचीत आहेत. सदर वि.प.नं. ४ यांना मे. कोर्टासमोर हजर राहणेस कोणतीही अडचन नाही. सदर अर्जदार यांना निशानी १२ प्रमाणे पुरसीस दाखल करून वि.प.नं. ४ यांना कमी करता येणार नाही. कारण वि.प.नं. ४ यांचे म्हणणे ऐकूण घेतले शिवाय अथवा संम्मती घेतले शिवाय सदरचे काम वर्ग करता येणार नाही. सदर वि.प.नं. ४ या मुळ दरखास्तदार नं. १ असून अर्जदार या दरखास्तदार नं. २ आहेत. याही कारणास्तव सदरचे काम वर्ग करता येणार नाही. सदर अर्जदार यांना वि.प.नं. ४ यांचे बाबत खरी वस्तुस्थिती माहित असताना सुध्दा त्यांनी दरखास्त दाखल केली होती व सदरचा अर्जही दाखल केलेला आहे. या सर्व कारणास्तव अर्जदार यांचा अर्ज चालणेस पात्र नाही त्यामुळे अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

५) प्रस्तुतचे अर्ज कामी प्रथम दर्शनी केस ही अर्जदार यांचे बाजूने नसून ती वि.प. यांचे बाजूने असलेने सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावे.

६) सदर कामी न्यायाचा तराजू हा अर्जदार यांचे बाजूने नसून तो वि. प. यांचे बाजुने असलेने सदरचा अर्ज नामंजुर झालेस अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

७) अर्जदार यांचे अर्ज नामंजुर झालेस अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु तसे न झालेस अर्जदार यांचे कधीही न

भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचे अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावे.

८) मा. खालील कोर्टानी वेळोवेळी पारीत केलेले आदेश कायदयाचे तरतुदीनुसार असलेने मा. खालील कोर्टाचे आदेश योग्य व न्यायप्रविष्ठ आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावे.

९) अर्जदार यांनी वि.प. यांना नाहक त्रास देणेच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला असलेने अर्जदाराकडून वि.प. यांना कॉम्पेनसेटरी कॉस्ट म्हणुन प्रत्येकी र. रू. ५०,०००/— याप्रमाणे देणेबाबत आदेश व्हावा.

**<u>सबब वि.प. नं.१ व २ यांची विनंती की,</u>**

अ) अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

ब) या अर्जाचा कोर्ट खर्च अर्जदाराकडून प्रस्तुत वि.प. यांना वसूल होवून मिळावा.

क) न्यायाचे जरूर ते सर्व हुकूम याचकामी व्हावेत.

ड) जरूर तर म्हणणे दुरूस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे कारणांचा विचार होऊन अर्जदार यांचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा.

वि.प.नं. १

कोल्हापूर

ता.२०/०२/२०२६

Presented by

Adv.